# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

शिवराज्यभिषेक दिनानिमित्त शिवस्वराज्य दिन सोहळा शनिवार दिनांक ०६ जून, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात संपन्न होणार आहे. सदर सोहळयामध्ये मा. कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांचे शुभहस्ते व मा. प्र—कुलगुरु प्रा. डॉ. (श्रीमती) ज्योती जाधव यांचे प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास पुष्पहार अर्पण करणे व मोठया पुतळयास फुले वाहणे हा समारंभ आयोजित करणेत आलेला आहे. तसेच विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारती समोर शिवज्योत रॅली व राजर्षी शाहू सभागृह येथे शाहीरी पोवाडा व शिवराज्याभिषेक नृत्य सादरीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व अधिविभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनीं यांनी समारंभास उपस्थित रहावे ही विनंती.

Kkabir

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/450
दिनांक : 04/06/2026

संचालक
विद्यार्थी विकास

प्रति,

१. सर्व पदव्युत्तर विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी—विद्यार्थीनी व प्रशासकीय सेवक यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा. कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
४. मा. कुलगुरु, मा. प्र—कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. वित्त व लेखा अधिकारी, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांच्या कार्यालयास माहितीसाठी
५. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांनी विद्यार्थी विकास विभागाशी संपर्क साधावा व सदरच्या कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत व विद्यापीठ गीत म्हणण्याची व्यवस्था करावी.
६. वाहन विभाग प्रमुख यांनी अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या सूचनेप्रमाणे साहित्य आणणेसाठी व नेण्यासाठी वाहन उपलब्ध करून दयावे.
५. जमादार यांनी चार शिपाई या विभागाच्या शिपायाच्या मदतीस दयावेत. त्याचप्रमाणे त्यांनी स्वत: उपस्थित रहावे तसे आदेश आस्थापना विभागाने त्यांना द्यावेत.
७. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी कार्यक्रमाच्यासाठी ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करावी व रांगोळीसाठी आदल्या दिवशी लाईटची व्यवस्था करावी.
८. आभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासंबंधी संबंधीत कर्मचारी यांना सूचना द्यावी व छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयाची देखभाल पहावी.
९. उद्यान विभागप्रमुखांनी कार्यक्रमाचे परिसरातील बागेची ठाकठिकता पहावी. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयास व लहान पुतळयास असे दोन पुष्पहार आणावेत. मोठया पुतळयास हार अभियात्रिकी विभागाच्या सहाय्याने अर्पण करण्याची व्यवस्था करावी. व मा. कुलगुरू यांचे शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास अर्पण केला जाईल. याची नोंद घ्यावी.
१०.नोटीस बोर्डवर लावणेसाठी —

| | |
|---|---|
| १) मुलींचे वसतिगृह क्र. १, २ व ३ | २) मुलांचे वसतिगृह क्र. १, २ व ३ |
| ३) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन | ४) बॅरीस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय. |
| ५) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थीनी भवन | ६) तंत्रज्ञान विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृह |

**टिप : सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व अधिकारी व प्रशासकीय सेवक यांच्या निदर्शनास आणावे.**

——oooo——